वर्ष-०८ | अंक-०९ | मुंबई, मंगळवार १८ ते २४ जानेवारी २०२२ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची पंडित बिरजू महाराज यांना श्रद्धांजली

3 → अवैधरित्या अन्नधान्य साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांविरुध्द कारवाई

खारेगाव रेल्वे उड्डाणपुलाला धर्मवीर आनंद दिघे यांचे नाव ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## कल्याणमध्ये वीज बिल कमी करण्याच्या बहाण्याने नागरिकांची फसवणूक करणारा भामटा गजाआड



कल्याण : लॉकडाऊननंतर नागरिकांना भरमसाठ लाईट बिलं आली होती. बिल भरण्यासाठी नागरिकांची महावितरण कार्यालयात एकच गर्दी होती. बिल कसे कमी होणार यासाठी लोक प्रयत्न करत होते. लोकांच्या या मानसिकतेचा फायदा एका भामट्याने उचलला. या भामट्याने अनेक लोकांकडून बिल कमी करण्याच्या नावाने पैसे उचलले. महावितरणला आपल्या नावावर चेक देखील दिला. चेक बाउन्स झाल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. अखेर साहिल पटेल नावाच्या भामट्याला कल्याण महात्मा फुले पोलिसांनी अटक केली आहे. लॉकडाऊनच्या काळात महावितरणकडून काही महिन्यांचे बिल घेतल गेलं नाही. लॉकडाऊननंतर पान २ वर...

# हिम्मत असेल तर गोव्याला एक मतदारसंघ लढवा

## नुसती भाषणं कसली करता





## चंद्रकांत पाटलांचं संजय राऊतांना थेट आव्हान

मुंबई : गोवा विधानसभा निवडणुकीवरुन राज्यातील राजकारण चांगलंच तापल्याचं पाहायला मिळत आहे. गोव्याचे दिवंगत मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांचा मुलगा उत्पल पर्रीकर यांच्या उमेदवारीवरुन शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी भाजप आणि विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केलीय.

त्याला प्रत्युत्तर देताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी संजय राऊतांना गोव्यातून लढण्याचं थेट आव्हानंच दिलं आहे. संजय राऊत यांचं फारच चाललं आहे. सगळ्या जगातले विद्वान ते आहेत. कशाला त्यांनी पर्रीकरांच्या मुलाला द्या, अपक्ष लढू दे, तुमचं कोण ऐकायला बसलं आहे तिथे. हिम्मत असेल तर गोव्यातला एखादा मतदारसंघ लढवा तुम्ही. मोदीची गुजरातमधून उठतात आणि उत्तर प्रदेशात जाऊन लढतात, तुम्ही लढा. नुकती आपली भाषणं करता, अशा शब्दात चंद्रकांत पाटील यांनी संजय राऊत यांना फटकारलं आणि थेट आव्हानही दिलं आहे. '..तर शिवसेना आणि अन्य पक्ष बिनविरोध करणार का?'

त्याचबरोबर संजय राऊत गोवा विधानसभेच्या विषयावरून बरीच वक्तव्ये करतात. दिवंगत नेते मनोहर पर्रीकर यांच्या मुलाला उमेदवारी देण्यावरूनही ते टीका टिप्पणी करत आहेत. उत्पल पर्रीकर यांना भाजपाने उमेदवारी ...पान २ वर...

# मुंबईत जम्बो ऑक्सिजन प्लांट

## दिवसाला दीड हजार ऑक्सिजन सिलेंडरची निर्मिती होणार



मुंबई: माहुल येथे जम्बो ऑक्सिजन प्लांटची उभारणी करण्यात आली आहे. या ऑक्सिजन प्लांटमधून दिवसाला सुमारे दीड हजार ऑक्सिजन सिलिंडरची निर्मिती केली जाणार आहे. खासदार राहुल शेवाळे यांच्या पाठपुराव्यानंतर निर्माण झालेल्या या ऑक्सिजन प्लांटचे राज्याचे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले आहे. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर, वैद्यकीय ऑक्सिजन निर्मितीत मुंबई महानगरपालिका सुसज्ज झाली आहे. खासदार राहुल शेवाळे यांच्या पाठपुराव्याने माहुल परिसरात भारत पेट्रोलियम कंपनी आणि मुंबई महानगरपालिका यांच्या वतीने उभारण्यात आलेल्या ऑक्सिजन प्लांटचे लोकार्पण पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या हस्ते ( व्हिडिओ कॉन्फन्सद्वारे) करण्यात आले. आजमितीला मुंबईत कार्यान्वित होणारे हे दोन ऑक्सिजन प्लांट म्हणजे कोणत्याही संकटाविरोधात लढण्याच्या मुंबई स्पिरीट चं अनोखं उदाहरण आहे. तिसऱ्या लाटेचा सामना करण्यासाठी राज्य सरकार आणि मुंबई महानगरपालिका सज्ज आहे, मात्र नागरिकांनी नियमांचे पालन करून कोरोना विरोधातील लढाईत सक्रिय सहभाग द्यायला हवा, असं आवाहन आदित्य ठाकरे यांनी केलं. देशातील पहिली महापालिका कोविड विषाणूच्या दुसऱ्या लाटेत इतर शहरे आणि राज्यातूनही वैद्यकीय प्राणवायू आणून मुंबई महानगरपालिकेने रुग्णांचे प्राण वाचवले. एका रात्री तर युद्धसदृश्य परिस्थिती हाताळून दीडशेपेक्षा अधिक रुग्णांना सुरक्षितपणे हलवावे लागले. इतकी प्राणवायूची कमतरता आपण अनुभवली. अशी स्थिती पुन्हा ओढवू नये म्हणून महानगरपालिकेने तेव्हाच ...पान २ वर...

# क्रेन चालकाचा मृत्यू; मेट्रो 6 मार्गाचा गर्डर बसवताना अपघात



मुंबई : स्वामी समर्थ नगर-जोगेश्वरी-विक्रोळी-कांजूर मार्ग मेट्रो ६ अंतर्गत जेव्हीएलआर सिग्नलजवळ मेट्रोचा गर्डर बसविताना रविवारी सकाळी ६ वाजता क्रेन कोसळली यात क्रेन चालकाचा मृत्यू झाला.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) या प्रकरणाची दखल घेत कंत्राटदार दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनला (डीएमआरसी) सुरक्षा परीक्षण अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. डीएमआरसीकडून मेट्रो ६ चे काम सुरू आहे. या कामाअंतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावरील कंजूरमार्ग येथील जेव्हीएलआर सिग्नल येथे मेट्रोचे गर्डर बसविण्यात येत आहेत. त्यानुसार रविवारी सकाळी येथील खांब क्रमांक पी ५३४ आणि ५३५ यामध्येगर्डर बसविण्यात येत होते. यासाठी ५०० मेट्रीक टन वजनाच्या क्रेनचा वापर करण्यात येत होता. सेवा रस्त्यावरही क्रेन उभी करत तेथूनच काम सुरु होते. हे काम सुरू असतानाच अचानक यातील सेवा रस्त्यावरील माती खचली आणि क्रेन मातीत रुतून कलंडली.

क्रेन कलंडत असल्याचे पाहून क्रेनचालक लवदीप रवींद्र सिंग (३५ वर्षे) याने उडी मारली. मात्र ज्या बाजूला त्याने उडी मारली त्याच बाजूला कलंडलेली क्रेन कोसळली आणि तो या क्रेनखाली अडकला. अडकलेल्या क्रेनचालकाला दुसऱ्या क्रेनच्या सहाय्याने बाहेर काढत राजावाडी रुग्णालयात नेण्यात आले.

तिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

# 04 महीन्याच्या बालिकेचे अपहरण करून

## विक्री करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश



०४ महीन्याच्या बालिकेचे अपहरण करून विक्री करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश.

मुंबई : दि. ०३/०१/ २२ रोजी अन्वरी अब्दुल रशीद शेख, वय ५० वर्षे यांनी वि. प. मार्ग पोलीस ठाणे येथे येवुन तक्रार दाखल केली कि त्यांच्या जवळ रखवालीत असणाऱ्या ०४ महीन्याच्या मुलीला इब्राहीम शेख नावाच्या इसमाने पळवुन नेले आहे.त्यांनी दिलेल्या तक्रारी वरून वि. प. मार्ग पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर घटनेच्या अनुषंगाने व.पो.नि संध्याराणी भोसले व पोलीस निरीक्षक (गुन्हे) विनायक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व अंमलदारांची तपास पथके तयार करण्यात आली. सदर पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा बारकाईने अभ्यास करून तसेच गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषनाच्या आधारे मिळालेल्या माहीतीवरून अथक प्रयत्न व परिश्रम करून नमुद गुन्हयातील एक आरोपी इब्राहीम अलताफ शेख यास प्रथम ताब्यात घेतले. त्याचा सखोल तपास करून सायन, धारावी, मालाड, जोगेश्वरी, नागपाडा, कल्याण, ठाणे अशा विविध परिसरात छापे टाकुन ०२ महीला व ०४ पुरूष अशा एकुण ०६ आरोपीनां पोलीसांनी अटक केली. सदर गुन्हयाच्या तपासात अटक केलेल्या आरोपींन कडुन गुन्हयातील अपहरण केलेल्या मुलीला त्यांनी कर्नाटक, तामिळनाडु ...पान २ वर...

# मांजा पकडल्याने मारहाण; वाहनांची तोडफोड, तणाव



मांजा पकडल्याने संतप्त सहा युवकांनी घरात घुसून गजानन शंकर तिवारी (वय ४५) यांना मारहाण करून घरासमोरील वाहनांची तोडफोड केली. ही घटना शुक्रवारी सायंकाळी सुरेंद्रगढ परिसरात घडली. या घटनेने परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता.

याप्रकरणी गिट्टीखदान पोलिसांनी सहा जणांविरुद्ध मारहाणीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. शैलेश श्यामलाल ...पान २ वर...

# घाटकोपरमधील मुलीचा मृत्यू लसीकरणामुळे झाला नसल्याचा पालिका प्रशासनाचा दावा



मुंबई : घाटकोपर येथील पंधरा वर्षीय मुलीचा लसीकरणाने मृत्यू झाल्याचे आरोप करणारे वृत्त व छायाचित्र समाज माध्यमांमध्ये पसरल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. मात्र या मुलीचा मृत्यू हा लसीकरणामुळे झाला नसल्याचा दावा पालिकेच्या यंत्रणेने केला आहे. या प्रकरणी वैद्यकीय पातळीवर चौकशी तसेच पोलिसांकडूनही तपास सुरू आहे. तसेच समाज माध्यमांवर मजकूर प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तीचाही शोध सुरू आहे. घाटकोपर मध्ये राहणाऱ्या आर्या नावाच्या मुलीने ८ जानेवारीला राजावाडी रुग्णालयात लस घेतली होती, तर १२ जानेवारीला तिचा मृत्यू झाला. तिचा मृत्यू लसीकरणामुळे झाला असल्याचा मजकूर तिच्या छायाचित्रासह एका व्यक्तीने समाजमाध्यमांवर टाकला होता. त्यामुळे पालिकेची यंत्रणा सतर्क झाली असून पालिकेने समाजमाध्यमावरच या व्यक्तीकडे पुरावे मागितले आहेत. मात्र त्याने काहीच उत्तर दिलेले नाही.

मात्र या घटनेनंतर महापौर किशोरी पेडणेकर यांनी आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले आहेत. महापौरांनी शनिवारी मुलीच्या कुटुंबीयांची घाटकोपर येथील निवासस्थानी जाऊन भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले. त्यावेळी महापौर म्हणाल्या की आर्याच्या आजोबांच्या म्हणण्यानुसार लसीकरणामुळे आमच्या मुलीचा मृत्यू झालेला नाही. अभ्यासाचा तिने अतिताण घेतल्याने ते असह्य होऊन हृदयविकाराच्या धक्क्याने तिचा मृत्यू ओढवला आहे. या दु:खद प्रसंगी कोणीही यामध्ये राजकारण आणता कामा नये, असे आवाहनही महापौरांनी केले आहे.'दिशाभूल करणाऱ्या व्यक्तीचा शोध'याबाबत पालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की लसीकरणाच्या चार-पाच दिवसानंतर तिचा मृत्यू झाला असून खासगी डॉक्टरांनी दिलेल्या प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण हृदयविकाराचा झटका असे म्हटले आहे. तरीही लसीकरणाच्या परिणामाबाबत अभ्यास करणाऱ्या 'अडवर्स इव्हेंट फोल्लोईंग ईम्युनायझेशन' या समितीला या प्रकरणाचा अभ्यास करण्याचे निर्देश दिले असल्याचे त्यांनी सांगितले.

# तस्करांची पोलिसांवर दगडफेक



निमटोला परिसरात गो-तस्करांनी पोलिसांवर दगडफेक केली. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. ही खळबळजनक घटना शनिवारी सकाळी ६ वाजताच्या सुमारास घडली. पोलिसांनी पाठलाग करून दोन गो-तस्करांना अटक केली. मुस्तकीन फिरोज खान (वय २४, रा. कामठी) आणि भालमान भान (वय २७, रा. बरघट, सिवनी), अशी अटकेतील तस्करांची नावे आहेत.

गोवंशाची तस्करी होत असल्याची माहिती देवलापारचे साहाय्यक पोलिस निरीक्षक बोरकुटे व उपनिरीक्षक सचिन डायलकर यांना मिळाली. त्याआधारे पोलिसांनी निमटोला चौकात नाकेबंदी केली. याचदरम्यान ...पान २ वर...

# मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची पंडित बिरजू महाराज यांना श्रद्धांजली

## नृत्य, संगीत क्षेत्रातील अढळ तारा

मुंबई, 17 :- कथ्थक सम्राट पद्मविभूषण पंडित बिरजू महाराज म्हणजे नृत्य, संगीत क्षेत्रातील अढळ तारा अशा शब्दांत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पंडित बिरजू महाराज यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

मुख्यमंत्री शोक संदेशात म्हणतात, कथ्थक सम्राट बिरजू महाराज यांचे नृत्य आणि संगीत क्षेत्रातील योगदान अमूल्य आहे. त्यांनी भारतीय कलेचे वैभव सातासमुद्रापार नेले. कला क्षेत्रात त्यांनी आपल्या नावाचा मानदंड निर्माण केला. नृत्य, संगीत हेच त्यांचे आयुष्य होते. ते सर्जक कला उपासक होते. त्यांचे कलारसिकांच्या हृदयातील स्थान ध्रुव ताऱ्याप्रमाणे अढळ राहील. पद्मविभूषण पंडित बिरजू महाराज यांना विनम्र श्रद्धांजली.

# बापरे... वर्ध्याच्या कदम रुग्णालयात 71 हजार मुदतबाह्य शासकीय गोळ्यांचा साठा सापडल्याने खळबळ

वर्धा : आर्वी येथील गर्भपात प्रकरणात तपासादरम्यान अनेक बाबी समोर येत आहे. शनिवारी कदम यांच्या रुग्णालयासह घरात जिल्हा आरोग्य विभागाच्या टास्क फोर्ससह पोलिसांनी झडती घेतली.

यात पथकाला मोठ्या प्रमाणात शासकीय औषधांचा साठा सापडला. त्यामुळे एकच खळबळ माजली आहे.

पथकाला रुग्णालयाच्या तपासणीदरम्यान मालाईन ड्रग्जचे 23 खोके, त्यात औषधीचे एकूण 2563 पॅकेट असून एकूण 71 हजार 764 गोळ्या आढळल्या आहे तर ऑक्सिटिन नामक 90 इंजेक्शन सुद्धा जप्त करण्यात आले आहे. ही सर्व औषधं शासकीय रुग्णालयाची असल्याची माहिती असून सर्व औषधं मुदतबाह्य आहेत. शुक्रवारी सकाळपासून सुरु असलेली तपासणी रात्री उशीरापर्यंत सुरु होती. याच दरम्यान, रुग्णालयातील ऑपरेशन रजिस्टर, एमटीपी रजिस्टरसह काही फाईल आणि रजिस्टर जप्त केले गेले आहेत. आज पुन्हा याठिकाणी तपासणी केली जाणार आहे.



रुग्णालयाच्या वरच डॉ. कदम यांचे घर असल्याने तेथेही शुक्रवारी तपासणी करण्यात आलीय. घरात तपासणी केली असता पोलिसांना एक कळवीटची कातडी तसंच अन्य बरंच साहित्य मिळाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

तर डॉक्टर कदम यांच्या आई नागपूर येथे रुग्णालयात दाखल असून तेथे त्यांचे वडील असल्याने घराच्या एका खोलीला टाळे होते. त्या खोलीत काय दडलं आहे हे अद्याप बाहेर आलेलं नाहीय. या गुन्ह्यात सुरुवातीला डॉ. रेखा कदमसह पाच आरोपींना अटक करण्यात आली होती तर मध्यरात्री डॉक्टर नीरज कदम यांना सुद्धा पोलिसांनी अटक केली आहे.

या प्रकरणात दररोज नवनवीन खुलासे होत आहे. आज अटक केलेले डॉक्टर नीरज कदम हे आर्वी येथील उपजिल्हा रुग्णालयात कंत्राटी डॉक्टर म्हणून कार्यरत आहे. कदम रुग्णालयच्या तपासणीदरम्यान सरकारी दवाखान्यात वापरण्यात येणारे औषधी आढळल्याने आता या आर्वी येथील आरोग्य विभागसुद्धा संशयाच्या भोवऱ्यात अडकले आहे.

# चेंबूरमध्ये बेपत्ता महिला, बालकाचा संशयास्पद मृत्यू



मुंबई : चेंबूरमध्ये बेपत्ता म्हणून नोंद असलेली महिला तिच्या साडेतीन वर्षांच्या मुलासह इमारतीच्या अठराव्या मजल्यावरून खाली पडत असल्याचे चित्रीकरण सीसीटीव्हीत झाले असून यानंतर ही महिला आणि हे बालक मृत्यू पावले. या महिलेने आत्महत्या केली असावी, की हा खूनाचा प्रकार असावा, याबाबत पोलीस तपास करीत आहेत.

श्रुती महाडिक (३७) असे मृत महिलेचे नाव असून ती कुर्ला येथे मुलगा राजवीर महाडिक आणि पतीसह राहत होती. बुधवारी ही महिला आणि मुलगा अचानक घरातून बेपत्ता झाले. याबाबत कुटुंबीयांनी पोलिसांत तक्रार केली होती. शुक्रवारी दुपारी या महिलेचा आणि तिच्या मुलाचा मृतदेह तिचे आई वडील वास्तव्यास असलेल्या चेंबूरमधील 'अल्टावीस्टा' इमारतीच्या आवारात सापडला.

स्थानिक रहिवाशांनी याची माहिती दिल्यानंतर चुनाभट्टी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेह ताब्यात घेतला. पोलिसांनी परिसरातील काही सीसी टीव्ही कॅमेरातील चित्रणाची तपासणी असता बुधवारी ही महिला इमारतीवरून खाली पडत असल्याचे निदर्शनास आले.

# विदर्भात अपघातांसाठी नागपूर ग्रामीण कुख्यात



जणांचा मृत्यू झाला. २० हजार ५२८ जण जखमी झाले. यातही विदर्भात नागपूर ग्रामीण हे अपघातांसाठी कुख्यात ठरले.

गेल्यावर्षी पहिल्या अकरा महिन्यांत राज्यात २६ हजार २८४ अपघातांच्या घटना घडल्या. यात ११ हजार ९६० जणांचा मृत्यू झाला. २० हजार ५२८ जण जखमी झाले. यातही विदर्भात नागपूर ग्रामीण हे अपघातांसाठी कुख्यात ठरले.

नागपूर ग्रामीणमध्ये ८८६ अपघांतात ४२९ जणांचा जीव गेला. ८१८ जखमी झाले. यवतमाळमध्ये ६७३ अपघातांमध्ये २९९ जणांचा जीव गेला. ४२० जखमी झाले.

सर्वाधिक अपघातांच्या घटना मुंबई शहरात घडल्या. मुंबईत १,८४४ अपघातांची नोंद झाली असून, २५८ जणांचा मृत्यू झाला, तर १,६१७ जखमी झाले. त्याखालोखाल नाशिक ग्रामीणमध्ये १,२९६ अपघातांची नोंद करण्यात आली. या घटनांमध्ये ७८४ जणांचा बळी गेला. ७२७ जखमी झाले. कोल्हापूरमध्ये ९२६ अपघातांत ३४६ मृत्युमुखी पडले. ९०० जखमी झाले. अहमदनगरमध्ये १,२०७ अपघातांच्या नोंदी झाल्या. या घटनांमध्ये ६३९ जणांचा जीव गेला तर ७५९ जखमी झाले. पुणे ग्रामीणमध्ये १,१२८ अपघातांमध्ये ७२९ जणांचा मृत्यू झाला असून, ७७४ जखमी झाले.

# गोमांस तस्करीच्या संशयातून ट्रकचा पाठलाग करणाऱ्या प्राणीप्रेमींवर हल्ला

मुंबई : गोमांस तस्करीच्या संशयातून एका ट्रकचा पाठलाग करत असताना दोन प्राणी प्रेमींवर चाळीस ते पन्नास जणांनी हल्ला केल्याची घटना कुर्ला कसाईवाडा येथे घडली आहे. या हल्ल्यात आशिष कमलाकांत बारीक आणि प्रतीक ननांवरे हे गंभीर जखमी झाले आहेत.

गोमांस तस्करीचा संशय आल्याने कमलाकांत बारीक आणि प्रतीक ननांवरे हे पोलिसांच्या गाडीतून जनावरे असलेल्या गाडीचा पाठलाग करत होते. या वेळी 40-50 जणांच्या जमावाने त्यांच्यावर हल्ला केला. घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस आयुक्त संजय दराडे, उपायुक्त कृष्णकांत उपाध्याय घटनास्थळी पोहोचले. पोलीस घटनास्थळी पोहोचताच हल्लेखोरांनी घटनास्थळावरून पळ काढला. परंतु, पोलिसांनी हल्ला करणाऱ्यांपैकी सात जणांना ताब्यात घेतले आहे.



दरम्यान, या प्राणी प्रेमींबरोबर असलेल्या पोलिसांवर देखील हल्ला झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. या हल्ल्याप्रकरणी पोलिसांनी सात जणांना ताब्यात घेतले आहे. आरोपींवर हत्येचा प्रयत्न, दंगल माजवणे, सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला, असल्याची माहिती चुना भट्टी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल देसाई यांनी दिली.

या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या आशिष कमलाकांत बारीक आणि प्रतीक ननांवरे यांना उपचारासाठी रूग्णलायात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, या घटनेबाबत प्राणी प्रेमींमधून संताप व्यक्त करण्यात येत असून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी प्राणी प्रेमी आणि विविध प्राणी प्रेमी संघटनांतून होत आहे. पोलीस घटनेचा अधिक तपास करत आहेत.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां.परिसर,
मराठी ग्रंथ संग्रहालयाजवळ ,स्टेशन रोड,ठाणे
(पश्चिम) पिन कोड - ४०० ६०१.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्र : (022) 2533 3144
(022) 2530 4514

वेबसाइट : www.mahapwd.com ई-मेल : elthane.ee@mahapwd.gov.in

जा.क्र. काअ/ ठाविवि/ निविदा-१ / ३७ /सन २०२१ दिनांक ६/०१/२०२२

ई निविदा सुचना क्र. 35 सन 2021-2022

संदर्भ:- १. महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग , मंत्रालय, मुंबई. शासन निर्णय क्र.सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८

कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (022) 25333144 हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामांकरीता ब-1 नमुन्यातील टक्केवारी दर (Percentage Rate ) ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीव्दारे निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (022) 25333144 यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही

| अ.क्र | कामाचे नावः | कामाची अंदाजित रक्कम रु. | ई-निविदा उपलब्ध कालावधी | निविदापुर्व बैठक/ ठेकेदारांचा वर्ग/ इसारा रक्कम / कोरा निविदा शुल्क | ई-निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Estt.No. OW/ KESD / Ulhasnagar./ 4358/2021-22, Providing erection of 200KVA Transformer with alied Ht/Lt line and solar PV panel on terrance for New Proposed Court Building of Civil Court Chokhaloli Tal. Ambernath Dist. Thane | रु .16,21,085 | दिनांक 14.01.2022 सकाळी 11.00 वाजेपासुन दिनांक 28.01.2022 सायंकाळी 18.00 वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही ठेकेदारांचा वर्ग-ब-व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे इसारा रक्कम रु 16,300/- निविदा शुल्क रु 500/- अधीक वस्तु व सेवा कर | दिनांक 01.02.2022 सकाळी 11.00 |

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.

1. https://mahatenders.gov.in (सदर निविदासुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल )
2. कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (022) 25333144 कार्यालयातील सुचना फलक
3. वरील कामांकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोंदणीकृत विद्युत ठेकेदार व ऊद्योग,उर्जा कामगार विभागर्कडोल विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत टेकेदार यासह ज्यांना तत्सम प्रकारचे काम यशस्वीपणे पुर्ण केल्याचा अनुभव आहे असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात.(अनुभवाचे प्रमाणपत्र लिफाफा क्र 1 मध्ये जोडण्यात यावे )
4. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकारी सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

सही/ -
( सं. रा.पुजारी )
कार्यकारी अभियंता (विद्युत)
ठाणे विद्युत विभाग,सा.बां.विभाग,
ठाणे

क्र.जिमाका / ठाणे/जाही/ २०२१-२२/८७

## पृष्ठ १ वरुन

### 04 महीन्याच्या बालिकेचे अपहरण करुन विक्री करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश.

राज्यामध्ये विक्री केल्याची माहीती समोर आली त्या अनुषंगाने पोउनि दिलीप तांबे आणि पोउनि अभिजित देशमुख यांची दोन पथके तामिळनाडु व कर्नाटक या राज्यामध्ये तपासाकरीता तात्काळ रवाना केली. पोउनि तांबे यांच्या पथकाने तामिळनाडु राज्यात आरोपींचा व अपहरण केलेल्या मुलीचा शोध घेण्यासाठी तीन जिल्हयामध्ये वेगवेगळया ठिकाणी चार दिवस अविरत विश्रांती न घेता चिकाटीने मानवी कौशल्य वापरून व तांत्रिक तपास करून अपहरण केलेल्या मुलीस सेलवानपट्टी पोलीस स्टेशन, कोईमतुर, तामिळनाडु येथुन कायदेशीररित्या सुखरूप ताब्यात घेतले. तसेच सदर गुन्हयात सहभागी असलेल्या तामिळनाडु येथील ०१ महीला व ०४ पुरूष अशा एकुण ०५ आरोपींना देखील ताब्यात घेण्यात आले. अशाप्रकारे सदर गुन्हयात सर्व पोलीस पथकांनी आपले मानवी कौशल्य पणास लावुन जलद गतीने हा गुन्हा उघडकीस आणला आहे. नमुद बालीकेस आरोपींनी ४,८०,०००/- रूपयास विक्री केल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. यातील अपहरण झालेल्या बालीकेची आई ही दि. ०१/१२/२१ पासुन तिच्या कामाकरीता बाहेर गेली ती अद्याप परत आलेली नसून पोलिस तीचा शोध करीत आहे. तसेच आरोपी इब्राहीम शेख हा बालीकेच्या आईचा मित्र असुन तो लिव इन रिलेशनशिपमध्ये तिच्यासोबत राहत होता. तसेच तो बालीकेचा वडील असल्याचे सांगत आहे. तरी बालीकेच्या पालकांची निश्चित ओळख पटण्याकरीता बालीकेची व आरोपी इब्राहीम याची डी.एन.ए. टेस्ट करण्याची प्रक्रिया चालु आहे. तसेच अपहरण झालेल्या बालीका हीला बाल कल्याण समिती समोर हजर करून त्यांचे आदेश प्राप्त करून सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आले आहे. नमुद गुन्हयाचा तपास श्री. विश्वास नांगरे- पाटील, पोलीस सह आयुक्त, कायदा व सुव्यवस्था, बृहन्मुंबई शहर, श्री. दिलीप सावंत, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई श्री.सौरभ त्रिपाठी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०२, मुंबई, श्री. राजेंद्र चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त, गिरगांव विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संध्याराणी भोसले व तपास अधिकारी पोलीस निरीक्षक (गुन्हे) विनायक पाटील, सपोनि अमित भोसले, सपोनि अविनाश शिंदे, पोउनि दिलीप तांबे, पोउनि राहुल पाटील, पोउनि हेमंत उगले, पोउनि उषा मस्कर, पोउनि अभिजित देशमुख, पोउनि सचिन आव्हाड, पोह सलीम मुजावर, पोना रूपेश परब, पोना मुन्ना सिंग, पोशि सचिन बरकडे, पोशि संदिप रोकडे, मपोशि शुभांगी देशमुख आणि मपोशि महाबली मुंदिनकेरी यांनी अथक परिश्रम घेवुन उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.

### मांजा पकडल्याने मारहाण; वाहनांची तोडफोड, तणाव

यादव (वय ४०), संजू राजू यादव (वय २३), अमित शिव यादव (वय २१, सर्व रा. सुरेंद्रगढ) व त्यांचे तीन साथीदार, अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. गजानन व त्यांचे नातेवाईक गच्चीवर पतंग उडवित होते. शैलेश व त्याचे साथीदार तेथे आले. 'मांजा का पकडला', अशी विचारण करीत त्यांनी गजानन यांच्याशी वाद घातला. त्यांना धक्काबुक्की करून ठार मारण्याची धमकी दिली. गच्चीवर असलेला स्पिकरला लाथ मारली. त्यानंतर घरासमोर उभ्या दोन वाहनांची तोडफोड केली.

### तस्करांची पोलिसांवर दगडफेक

एमएच ४० बीजी ९५७८ क्रमांकाचा ट्रक संशयास्पदस्थितीत येताना दिसला. पोलिसांनी चालकाला ट्रक थांबविण्याचा इशारा केला. मात्र, चालकाने ट्रकचा वेग वाढविला. लोखंडी कठड्याला धडक दिली. पोलिसांनी कसाबसा ट्रक थांबविला. मुस्तकीन व भालमान या दोघांनी डायलकर व त्यांच्या सहकाऱ्यांना धक्काबुक्की करीत पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी दोघांचा पाठलाग सुरू केला. भालमान याने पोलिसांच्या दिशेने दगडफेक केली. पोलिसांनी दोघांना पकडले.

### कल्याणमध्ये वीज बिल कमी करण्याच्या

महावितरणकडून वीज बिल आकारणी सुरु केली. नागरिकांना भरमसाठ बिल आले होते. एकीकडे लॉकडाऊन दुसरीकडे भरमसाठ विज बिल आल्याने नागरिक त्रस्त होते. महावितरणच्या कार्यलयात बिल कमी करण्यासाठी नागरिकांच्या रांगा लागल्या होत्या. नागरिक महावितरण कार्यालयात वीज बिल कमी करण्यासाठी व भरण्यासाठी रांगा लावत होते. याच गर्दीत एक तरुण काही लोकांना भेटला. चेक बाऊन्स झाल्याने महावितरणच्या अधिकाऱ्यांनी तपास केला कुणाचे 40 हजार, कुणाचे 50 हजार, कुणाचे 30 हजार अशी बिले आली होती. ही बिले कमी करून देतो, महावितरणमध्ये माझी ओळख आहे असे सांगत जवळपास 23 जणांकडून बिल भरण्यासाठी रक्कम घेतली. इतकेच नव्हे तर महावितरणमध्ये बिल भर यासाठी स्वतःच्या खात्याचा वापर करत चेक दिला. मात्र हा चेक बाऊंस झाल्याने महावितरण अधिकाऱ्यांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला तेव्हा ही बाब समोर आली. या तरुणाने अनेक जणांना बिल कमी करून देण्याचा बहाण्याने पैसे उकळून फसवले होते. या प्रकरणी मार्च 2021 मध्ये कल्याणच्या महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रार केली. सात महिन्यांच्या तपासानंतर पोलिसांनी साहिल पटेल याला शोधून अटक केली आहे. साहिल पटेल याला पोलिसांनी अटक केली आहे. त्याने अशा प्रकारे अजून किती जणांना फसवले आहे याचा तपास पोलीस करत आहेत.

### हिम्मत असेल तर गोव्याला एक मतदारसंघ लढवा

दिली तर त्यांना बिनविरोध विजयी करण्याची हमी शिवसेना आणि इतर पक्ष देणार का, असा सवालही चंद्रकांत पाटील यांनी राऊतांना केलाय. संजय राऊतांचा फडणवीसांवर निशाणा गोव्यातील भाजप नेते उत्पल पर्रिकर यांनी तिकीट वाटपावरून भाजप नेत्यांवर हल्लाबोल केला आहे. गोव्यात खुनी, बलात्कारींना तिकीट मिळतं. मला का मिळत नाही? असा सवाल उत्पल पर्रिकर यांनी केला होता. याकडे संजय राऊत यांचं लक्ष वेधलं असता राऊत यांनी फडणवीसांवर खोचक टीका केली. उत्पल पर्रिकर यांच्या मताशी मी सहमत आहे. भाजपने नैतिकता, साधन शुचितेच्या गप्पा मारू नयेत. गोवा ही देवभूमी आहे. भाजपच्या तोंडी कायम नैतिकतेचं भजन असतं. भाजपच्या गोव्यातील नेत्यांवर गंभीर आरोप आहेत. ते लँड माफिया आहेत. काहींवर अफू चरस, गांज्याचे आरोप आहेत. त्यांना पक्षात घेतलं आहे. त्यामुळे उत्पल पर्रिकरांचं योगदान काय? या पेक्षा राजकारणातील ग्रेट गॅम्बलर्स आणि ठकस् ऑफ गोवा घेऊन तुम्ही निवडणुका लढू इच्छिता का? फडणवीसांचं गोव्यात येऊन अध:पतन झालं आहे त्याचं वाईट वाटतं. फडणवीसांकडून ही अपेक्षा नव्हती. फडणवीस साहेबांकडे आम्ही वेगळ्या पद्धतीने पाहतो. पण गोव्याची हवा त्यांना लागलेली दिसते, असा हल्लाबोल राऊत यांनी चढवला आहे.

### मुंबईत जम्बो ऑक्सिजन प्लांट

स्वतःचे वैद्यकीय प्राणवायू साठवण व सिलेंडर पुनर्भरण प्रकल्प उभारण्याचा निश्चय केला. आज या प्रकल्पांच्या लोकार्पणातून महत्त्वाचे पाऊल उचलले गेले असून अशाप्रकारचे प्रकल्प असणारी देशातील पहिली महानगरपालिका म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेची नोंद झाली आहे, असं आदित्य म्हणाले. कोविड विषाणूचे डेल्टा व ओमायक्रॉन हे दोन्ही उपप्रकार अद्याप फैलावत असून सर्वांनी मास्कचा उपयोग, हातांची स्वच्छता, सुरक्षित अंतर यासारख्या नियमांचे कटाक्षाने पालन करणे आवश्यक आहे, असे आवाहनही करतानाच दोन्ही प्रकल्पांची वेगाने उभारणी केल्याबद्दल त्यांनी महापौर, सर्व लोकप्रतिनिधी, बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन व बीपीसीएल यांचेही कौतुक केले. वैद्यकीय ऑक्सिजन पुरवठ्याची मागणी पूर्ण होणार कोरोनाच्या दुसऱ्या लाटेच्या आधीच राज्य सरकारने ' मिशन ऑक्सिजन ' ची घोषणा केली होती. त्याचाच एक भाग म्हणून खासदार राहुल शेवाळे यांनी आपल्या लोकसभा मतदार संघातील मोठ्या कंपन्यांना ऑक्सिजन प्लांट सुरू करण्याचे आवाहन केले होते. याला प्रतिसाद देत भारत पेट्रोलियम कंपनीने मुंबई महानगरपालिकेच्या मदतीने या जंबो ऑक्सिजन प्लांटची उभारणी केली असून या प्लांट मधून दिवसाला सुमारे दीड हजार ऑक्सिजन सिलेंडरची निर्मिती केली जाणार आहे. कोरोना विरोधातील लढाईसाठी मुंबई महानगरपालिका आणि राज्य सरकार सर्वतोपरी सज्ज आहे.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार १८ ते २४ जानेवारी २०२२

संपादकीय...



## शाळांना कुलुपे ठोकायची बेजबाबदार घाई कशासाठी?

एका गावात शाळा सुरू होती. मुले शिकत होती. शिक्षक त्यांना शिकवत होते. त्याच गावात शहरातले काही पर्यटक आले. त्यांनी शाळा सुरू असलेली पाहून थेट शिक्षकांनाच प्रश्न केला. 'शाळा बंद करण्याचा निर्णय असताना तुम्ही शाळा कशी काय सुरू केली..?' शिक्षक उलट उत्तर देऊ शकले असते, 'की, काहो, पर्यटनावर बंदी असताना तुम्ही कसे फिरायला आलात..?' मात्र त्यांनी तसे केले नाही. एकाच आठवड्यात असा प्रश्न त्या शिक्षकास किमान दहा लोकांनी केला. शेवटी त्यांनी ती शाळा कोणालाही दिसणार नाही अशा ठिकाणी सुरू केली. काही दिवसांनी गावातल्या काही उडाणटप्पू लोकांनी ती शाळा बंद केली. ही घटना महाराष्ट्रातील एका छोट्या गावात घडलेली आहे. आई-वडिलांसोबत मुले मॉलमध्ये फिरायला गेलेली चालतात. मात्र, तीच मुले शाळेत आल्यानंतर त्यांना कोरोना कसा होतो.., असा प्रश्न मुंबईतल्या पालकांच्या गटाने केला होता. जे लोक कामधंदा करून घरी येतात; ते कोरोना घेऊन येत नसतील कशावरून..?



त्यांच्यामुळे मुले बाधित होत नसतील का? कोरोना काय फक्त शाळेत गेल्यानंतरच होतो का? या आणि अशा अनेक प्रश्नांनी सध्या जागृत पालकांना त्रस्त करून सोडले आहे. शाळा चालू झाल्या पाहिजेत. मुलांचे शिक्षण व्यवस्थित झाले पाहिजे, असे वाटणाऱ्या पालकांची व शिक्षकांची संख्या खूप मोठी आहे. मात्र, कोणालाही हा प्रश्न गंभीरपणे सोडविण्याची इच्छा नाही. ग्रामीण भागात अत्यंत वाईट परिस्थिती आहे.गेली दोन वर्षे, आज आदेश निघतो आणि उद्यापासून शाळा बंद होतात. एक शिक्षिका पोटतिडकीने सांगत होत्या, 'त्यांच्या चौथीच्या मुलांना त्यांना तिसरीचे शिक्षण द्यावे लागत आहे. तेदेखील मुलांना कळत नाही.' एका गावात तर 'शाळा सुरू का राहिल्या?' अशी विचारणा करणारे अर्ज माहिती अधिकारात आले. त्यामुळे चांगले शिक्षकही विनाकारण भानगड नको म्हणून काम करायलाच तयार नाहीत. शाळा बंद असल्यामुळे चारचौघांत वागण्याचे कौशल्य मुले गमावत चालली आहेत. संवादाची क्षमता हरवत चालली आहेत.नर्सरीसारख्या वर्गात मुले एकत्र येतात, एकमेकांशी बोलतात, त्या बोलण्यातून त्यांची बोलण्याची क्षमता विकसित होते. ती प्रक्रिया गेली दोन वर्षे पूर्णपणे ठप्प झाली आहे. एकाग्रतेने काम करण्याची क्षमता, लेखनाची क्षमता मुले विसरून गेली आहेत. दोन तासही मुले एका जागी स्थिर बसू शकत नाहीत. मानसिक ताण घेण्याची क्षमता नष्ट होत चालली आहे. चांगल्या दर्जाचे मोबाईल असंख्य पालकांकडे नाहीत. तीस मिनिटांचे लेक्चर झाले पाहिजे, असा सरकारी खाक्या! मात्र, त्या तीस मिनिटांत अनेक वेळा इंटरनेट कनेक्शन कट होते. काही जिल्ह्यांतील मुख्य कार्यकारी अधिकारी स्वतःच्या ईगोपलीकडे काहीही बघायला तयार नाहीत. त्यांची स्वतःची मुले जर अशा परिस्थितीतून गेली असती तर त्यांनी काय केले असते, असा सवाल जिल्हा परिषदेच्या एका शिक्षिकेने अत्यंत पोटतिडकीने केला.ग्रामीण भागात वेगळेच प्रश्न आहेत. तेथे मुलांची संख्या कमी झाली तर त्या शाळा बंद करण्याचा सरकारचा जुना निर्णय आहे. आज मुलांची संख्या कमी झाल्याचे कारण दाखवून अनेक शाळा जर भविष्यात बंद केल्या गेल्या तर ग्रामीण भागात शिक्षणच उपलब्ध होणार नाही. जेथे मुले कमी आहेत त्या ठिकाणी सुरक्षित अंतर ठेवून शाळा चालू शकतात. मात्र 'सब घोडे बारा टक्के' याप्रमाणे सगळ्याच शाळांना सारखे नियम लावले जात आहेत. शाळा होत नाहीत हे लक्षात आल्यानंतर ग्रामीण भागातील पालक मुलांना शेतीच्या कामाला जुंपू लागले आहेत. शिक्षकांच्या बाबतीतही अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यांची शिकवायची सवयच सुटत चालली आहे. ज्यांना चांगले शिकवायचे आहे, ज्यांना स्वतः अध्ययन आणि वेगळे प्रयोग करायचे आहेत, ते शिक्षक अस्वस्थ आहेत.परदेशात आपल्यापेक्षा रुग्ण संख्या कितीतरी जास्त आहे. मात्र त्या ठिकाणच्या शाळाही सुरू आहेत. आपल्याकडे असे अजब निर्णय का घेतले जातात? याचे उत्तर सरकार, शिक्षण विभाग आणि शिक्षणमंत्री कोणीही ठामपणे देत नाही. इतकी विदारक स्थिती कधीही पाहायला मिळाली नव्हती. गेली दोन वर्षे शाळा बंद आहेत. याचे परिणाम ही मुले जसजशी मोठी होत जातील तसतसे जाणवू लागतील. त्यांच्या मानसिकतेवर होणारे परिणाम या मुलांचे पुढचे सगळे आयुष्य धोक्यात आणणारे ठरतील, अशी भीती मानसोपचार तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. कोणीतरी याकडे गंभीरपणे पाहणार आहे का..?

# महागाईचा गाडा

महागाई दाट झाडीत दबा धरून बसते आणि सावजाला काही कळायच्या आत त्यांची शिकार करते..' असे काही खरेच घडते काय? नाही, निश्चितच नाही. आपणा सर्वांना चांगली परिचित असलेली महागाई अथवा तिच्यासाठी अधिक समर्पक शब्दप्रयोग म्हणजे चलनवाढ ही दबक्या पावलाने जरी येत असली, तरी घाव घालणार असल्याचे संकेत ती देतच असते. त्याची दखल घेऊन तात्पुरते आणि दीर्घकालीन उपाय वेळीच योजले गेले नाहीत, तर मात्र तिचे तांडव आणि रौद्र रूप अनुभवास येते. बुधवारी जाहीर झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, किरकोळ किमतीवर आधारित महागाई निर्देशांक, ज्याला ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय) म्हटले जाते, त्याने सरलेल्या डिसेंबरमध्ये ५.६ टक्के असे पाच महिन्यांचा उच्चांक गाठला. जुलै २०२१ नंतरचा महागाईने गाठलेला हा सर्वोच्च स्तर. किंबहुना गेले पाच महिने त्यात निरंतर वाढच सुरू आहे. महागाई दर मोजण्याच्या दोन सर्वसाधारण पद्धती आहेत. त्यातील पहिली पद्धत म्हणजे डब्ल्यूपीआय (होलसेल प्राइस इंडेक्स) म्हणजेच घाऊक किंमत निर्देशांक आणि दुसरी पद्धत सीपीआय (कंझ्युमर्स प्राइस इंडेक्स) ग्राहक किंमत निर्देशांक अथवा किरकोळ महागाई दर. यातील दुसऱ्या म्हणजे किरकोळ महागाईचा दर हा अधिक विश्वासार्ह आणि धोरण आखण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. जाहीर झालेल्या आकडेवारीत या महागाईने फणा उगारणे हे अधिक चिंताजनक आहे. नोव्हेंबरमधील ४.९१ टक्क्यांच्या तुलनेत डिसेंबरमध्ये तो दर ५.५९ टक्के असा कडाडला आहे. दुसरीकडे घाऊक महागाईचा दरही एप्रिलपासून सलग दोन अंकी पातळीवर असून, नोव्हेंबरमध्ये १४.२३ टक्क्यांवर पोहोचून या दराने १२ वर्षांतील उच्चांक गाठला. गेल्या दोनेक महिन्यांत सणोत्सवाच्या काळात वस्तू आणि सेवांसाठी मागणी अधिक वाढली. परिणामी घरगुती वापराच्या इंधनाबरोबरच स्वयंपाकाचा गॅस (एलपीजी), पाइप्ड गॅस (पीएनजी) यांच्यासह खाद्यान्न वस्तू आणि भाजीपाल्याच्या किमतीत वाढ झाल्याचे दिसले. अवेळी, अवकाळी बरसलेल्या पावसानेही एकूणच अन्नधान्य महागाईच्या भडक्यास हातभार लावला. पेट्रोल-डिझेलच्या किमतीतील वाढीसह, घरगुती वापराच्या स्वयंपाकाच्या गॅससह (एलपीजी-पीएनजी) आणि वाणिज्य वापरातील इंधनाच्या दरातील मोठी वाढ ही एकूण किंमतवाढीच्या भडक्याचे गेल्या काही महिन्यांतील मुख्य कारण ठरली आहे. संबंध जगभरातच आणि अमेरिकेत तर महागाईने ४० वर्षांतील उच्चांक गाठला आहे. बुधवारीच अमेरिकेतही डिसेंबरमधील महागाईचे अर्थात ग्राहक किंमत निर्देशांकाचे आकडे आले. ते गेल्या वर्षांच्या तुलनेत ७ टक्क्यांवर कडाडल्याचे, अर्थात मागील ४० वर्षांतील उच्चांकपदाला पोहोचल्याचे स्पष्ट झाले. जून १९८२ नंतरच्या सरलेल्या वर्षांतील डिसेंबर हा अमेरिकाच, नव्हे युरोपीय महासंघातील अनेक राष्ट्रांसाठी महागाईच्या तीव्र भडक्याचा महिना ठरला. कैक दशके २ टक्क्यांपेक्षा खाली असलेला दर अमेरिकेत गेल्या मार्चमध्ये प्रथम २.६ टक्क्यांवर गेला आणि पुढे तो वाढतच गेला. करोना साथीच्या उद्रेकाने मंदावलेली अर्थव्यवस्था अपेक्षेपेक्षा खूप अधिक वेगाने सावरताना दिसली. त्या तुलनेत वाढलेल्या मागणीची पूर्तता करता येईल इतकी सुसज्जता वस्तूच्या निर्मात्या आणि सेवा प्रदात्यांनाही करता आली नाही. शिवाय, 'पुरवठा श्खृंलेतील अडचणी कायम राहिल्याने आणि कामगारटंचाई तसेच आवश्यक कच्च्या मालाचा अपुरा पुरवठा यातून मागणी-पुरवठ्य़ातील वाढलेल्या दराने किमती वाढविणारा परिणाम साधला'




असे अमेरिकेतील मध्यवर्ती बँक – फेडरल रिझर्व्हचे प्रारंभिक अनुमान होते. आता, अर्थव्यवस्थेच्या अनेक क्षेत्रांमध्ये मागणीचा स्तर पुरवठ्य़ापेक्षा खूप वाढल्याने महागाईचा पारा किमान या वर्षभर तरी चढलेलाच राहील असे अनेक अर्थतज्ज्ञांचे कयास आहेत. पण महागाईचे चटके भारतातील सर्वसामान्यांना अधिक बसत आहेत. गेल्या काही महिन्यांत रोजच्या ताटात पडणाऱ्या जिनसांपासून, कपडेलत्ते, पादत्राणे, प्रवास व वाहतूक खर्च सर्वच बाबतीत सर्वसामान्यांच्या खिशाला बसणारी कात्री वाढली आहे. गेल्या आठ महिन्यांत घरगुती गॅस सिलिंडरच्या (एलपीजी) दरात दोनशे रुपयांहून अधिक वाढ झाली आहे. खाद्यतेलाच्या किमती तर वर्षभरात दुप्पट झाल्या. डाळी-कडधान्यांच्या दरात दोन वर्षांपूर्वीच्या तुलनेत जवळपास दीडपट वाढ झाली आहे. धान्ये, कडधान्ये व तेलांचे भाव वाढल्याने फरसाण, मिठाई व अन्य खाद्यपदार्थांचे दरही वाढले आहेत. गेले काही दिवस बिस्किटांचे भाव कंपन्यांमधील स्पर्धेमुळे काहीसे परवडणारे राहिले; पण या कंपन्यांनी केलेली चलाखी म्हणजे, बिस्किटांच्या पुडय़ांचे भाव तेच ठेवून पुडय़ांचा आकार कमी केला गेला आहे. इंधनाचे व इतर वस्तूंचे भाव वाढत राहिल्याने हॉटेल व खाणावळींच्या दरातही वाढ होत आहे. आधीच करोना व टाळेबंदीमुळे दीड वर्षांत लाखोंवर रोजगार गमावण्याची वेळ आली, तर काहींचे उत्पन्न/ वेतनमान घटले. अनेकांना औषधोपचारांवर त्यांची संपूर्ण बचत आणि भविष्यासाठी गोळा केलेले सर्व गमवावे लागले. अशा स्थितीत केंद्र सरकारने शंभरीपार गेलेले पेट्रोल-डिझेलचे दर आटोक्यात आणण्यासाठी त्यावरील उत्पादन कराचा भार कमी केला. पाठोपाठ राज्यांनीही मूल्यवर्धित करात काहीशी कपात केली. खाद्यतेलावरील आयात शुल्कात कपातीच्या केंद्राच्या निर्णयानंतर, देशातील खाद्यतेल उत्पादकांनी किरकोळ विक्री किमती १० टक्क्यांच्या घरात कमी करून त्याचा थेट लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचविला. पुरवठ्य़ाच्या अंगाने किंमतवाढीचा परिणाम कमी करण्याच्या दृष्टीने हे प्रयत्न बरेच सफलही ठरल्याचे दिसून आले. रिझर्व्ह बँकेला पतधोरण ठरविताना, म्हणजे बँकांकडून कर्जावरील व्याज दर वाढवावेत की कमी करावेत याचा निर्णय घेण्यासाठी किरकोळ महागाई दराची आकडेवारीच उपयुक्त ठरते. पण महागाई दराची ही पातळी ६ टक्क्यांच्या खाली राखणे याची रिझर्व्ह बँकेवर वैधानिक जबाबदारीही आहे. तिच्या मते, चालू आर्थिक वर्षांच्या चौथ्या तिमाहीत अर्थात जानेवारी ते मार्च २०२२ दरम्यान महागाई दरामध्ये मोठय़ा प्रमाणावर वाढ होण्याची (सरासरी ५.७ टक्के, जो डिसेंबरमध्येच गाठला गेला) शक्यता आहे. मात्र त्यानंतर रब्बीचे पीक उत्पादन बाजारात आल्याने, निदान अन्नधान्य महागाईच्या बाबतीत तरी उसंत मिळेल आणि हा दर आटोक्यात येऊ शकेल. म्हणजेच नवीन आर्थिक वर्षांत महागाई दर सरासरी ५ टक्के राहण्याचा कयास रिझर्व्ह बँकेने व्यक्त केला आहे. मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावर खनिज तेलाच्या किमती आता पुन्हा पिंपामागे ८० डॉलरवर गेल्या असून, करोनाचा नवीन अवतार ओमायक्रॉनचा वाढता उद्रेक पाहता ही वाढ १०० डॉलरवर जाऊ शकेल. भारताची ८५ टक्के इंधन गरज ही आयात होणाऱ्या तेलावर असल्याचे पाहता, आंतरराष्ट्रीय किमतीतील हा भडका आगीत तेल ओतून वणवा भडकावणारा ठरेल. अशा स्थितीत गेली दोन वर्षे रोखून धरलेली व्याज दरवाढ करण्याशिवाय रिझर्व्ह बँकेकडे आगामी आर्थिक वर्षांत दुसरा पर्याय राहणार नाही, असाही विश्लेषकांचा कयास आहे. थोडक्यात, महागाईचा गाडा सुरू झाला आहे. आधीच अडखळलेल्या अर्थचक्राची गती आणखी मंदावणे, नवीन रोजगार व उत्पन्नाच्या संधी घटणे हे त्याचे परिणाम सामान्यांच्या दृष्टीने आणखीच मारक ठरतील.

# अवैधरित्या अन्नधान्य साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कारवाई





मुंबई,अवैधरित्या अन्नधान्य साठवणूक करणारे गोदामचालक ओमप्रकाश यादव व टेम्पो चालक मोहिद्दीन शेख यांच्याविरूध्द नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा कान्हुराज बगाटे यांच्या मार्गदर्शनाखालील भरारी पथकाने कारवाई केली असून त्यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अशी माहिती नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात अन्नधान्याचे वितरण सुरळीत होणे तसेच अन्नधान्य पुरवठा व वितरणामध्ये कोणताही गैरप्रकार होणार नाही याकरिता नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे मार्गदर्शनाखाली भरारी पथक गठित करण्यात आलेले आहे. या भरारी पथकामार्फत जीवनावश्यक वस्तू कायदा 1955 अतंर्गत 14 जानेवारी 2022 रोजी अवैधरित्या अन्नधान्याची वाहतुक करणाऱ्या टेम्पो क्र. एम.एच.01-डीआर.1780 चा चालक मोहिद्दिन बाबू शेख याचे विरुध्द तुर्भे पोलीस ठाणे येथे जीवनावश्यक वस्तू कायदा 1955 अतंर्गत गुन्हा (नोंद क्रमांक 11/2022) दाखल करण्यात आलेला आहे. या कारवाईमध्ये 7,830 किलो गहू व टेम्पो असा एकुण रुपये 13,66,430/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. टेम्पोचालक मोहिद्दिन बाबू शेख याने दिलेल्या माहितीनुसार भरारी पथकाने जगताप कंपाऊड, सावित्रीबाई फुले शाळेच्या बाजूला असलेल्या कंपाऊडच्या आत पत्र्याच्या शेडमध्ये अनधिकृतपणे अन्नधान्याचा अवैध साठा आढळून आल्याने या ठिकाणी छापा टाकून एकुण 42 हजार 506 किलो गहू व 8 हजार 085 किलो तांदुळ असा एकुण रुपये 16 लाख 19 हजार 800/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून गोदाम चालक ओमप्रकाश यादव याचेवर नेहरु नगर, पोलीस ठाणे, कुर्ला येथे जीवनावश्यक वस्तू कायदा 1955 अतंर्गत गुन्हा (नोंद क्रमांक 2/2022) दि. 15 जानवारी 2022 रोजी दाखल करण्यात आलेला आहे. या कारवाईमध्ये भरारी पथकातील शिधावाटप निरीक्षक सर्वश्री भगवान खंडेराव, सुशिल साळसकर, संदिप चौधरी, अमोल बुरटे, तसेच स्थानिक शिधावाटप कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी विलास उदुगडे,विजय राठोड, नागनाथ हंगरगे, गजानन फाले, राजेश सोरटे, मंगेश राणे, संदिप साबळे, बाळासाहेब कारंडे तसेच तुर्भे पोलीस ठाणे व नेहरु नगर पोलीस ठाणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी सहभागी होते अशी माहिती नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा विभागाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

## प्रजासत्ताक दिन सोहळ्यात महाराष्ट्राच्या चित्ररथाला परवानगी नाकारलेली नाही

### सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे स्पष्टीकरण



मुंबई, : प्रजासत्ताक दिनी नवी दिल्ली येथे होणाऱ्या संचलनात महाराष्ट्र राज्याच्या चित्ररथाला परवानगी नाकारलेली नसल्याचे स्पष्टीकरण सांस्कृतिक कार्य संचालनालयाने केले आहे. प्रजासत्ताक दिनी नवी दिल्ली येथे होत असलेल्या संचलनात महाराष्ट्र राज्याने सादर केलेल्या विविध विषयांमधून या वर्षी 'महाराष्ट्राची जैवविविधता व मानके' या विषयाची केंद्र शासनाकडून निवड करण्यात आली आहे. याबाबत वेळोवेळी संरक्षण मंत्रालयाच्या सूचनेनुसार बैठका आयोजित होऊन महाराष्ट्र राज्याच्या चित्ररथाची एकूण 12 राज्यांसमवेत निवड अंतिम करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत राष्ट्रीय रंगशाळा, नवी दिल्ली येथे संरक्षण मंत्रालयाच्या देखरेखीखाली चित्ररथाची बांधणी सुरु असून हे काम अंतिम टप्प्यात आहे. महाराष्ट्राच्या चित्ररथाला परवानगी नाकारल्याबाबत कोणतीही सूचना संरक्षण मंत्रालयाकडून प्राप्त झालेली नाही. असे स्पष्टीकरण सांस्कृतिक कार्य संचालनालयाने केले आहे.

# रविवारी सुट्टीच्या दिवशी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्लास्टिक वापर विरोधात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत धडक कारवाई

## ५५० किलो प्लास्टिक जप्त करून रु. २० हजार इतका दंड वसूल






मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त श्री. दिलीप ढोले यांच्या निर्देशानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाने मागील आठवड्यापासून प्लास्टिक वापर विरोधात कारवाई करण्यास सुरूवात केली आहे. दिनांक १६ जानेवारी २०२२ रोजी सुट्टीच्या दिवशी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्लास्टिक वापर विरोधात मोठी कारवाई करण्यात आली. या कारवाई मध्ये उपायुक्त (सार्व. आरोग्य) रवि पवार यांनी स्वतः उपस्थित राहून सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यां समवेत प्लास्टिक बॅग, आणि "सिंगल युज प्लास्टिक" विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करून जवळपास ५५० किलो प्लास्टिक जप्त करून रु. २० हजार इतका दंड वसूल केला आहे.

महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग निर्णयानुसार आता महाराष्ट्र राज्यात एक वेळ वापरून फेकून देण्याच्या प्लास्टिक ( single use plastic) वापरावर बंदी आहे. शहरातील भाजी विक्रेते, दुकानदार शहरात सर्रास प्लास्टिक बॅग चा वापर करताना दिसून येतात. त्याच प्रमाणे "युज अँड थ्रो" च्या डब्या, प्लेट्स, ग्लासेस, शोभेच्या माळा, थर्माकोल, इत्यादी वापराच्या वस्तू सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रक्रिया प्रकल्पावर मोठ्या प्रमाणात दररोज जमा होत आहेत. त्याठिकाणी मनुष्य बळ वापरून हे प्लास्टिक वेगळे करण्यात येत आहे. त्यामुळे कामगारांच्या देखील आरोग्याचा आणि एकंदरीत या शहराच्या आरोग्याचा मोठा पर्यावरणीय प्रदूषणाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

महानगरपालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्या निर्देशानुसार व उपायुक्त (सार्व. आरोग्य) रवि पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कर निरीक्षक, मुकादम यांच्या उपस्थितीत शहरातील विविध भागात प्लास्टिक वापर विरोधात धडक कारवाई करण्यात आली. भाजी विक्रेते, फेरीवाले, दुकानदार अश्या १०० पेक्षा जास्त प्लास्टिक वापर करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करून प्लास्टिक जप्त करण्यात आले. प्लास्टिक बॅग, आणि "सिंगल युज प्लास्टिक" विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करून जवळपास ५५० किलो प्लास्टिक जप्त करून रु. २० हजार इतका दंड वसूल करण्यात आला आहे. त्याचबरोबर प्लास्टिकचा वापर करणारे विक्रेते व नागरिकांना पहिल्या वेळेस रु. ५००० , दुसऱ्या वेळेस रु. १०००० व तिसऱ्या वेळेस रु. २५००० इतका दंड आकारून फौजदारी गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे असे उपायुक्त (सार्व. आरोग्य) रवि पवार यांनी सांगितले आहे. "सिंगल युज प्लास्टिक" च्या वापरावर महाराष्ट्र शासनमार्फत बंदी आहे तसेच यामुळे पर्यावरणाला देखील हानी पोहचत आहे म्हणूनच "सिंगल यूज प्लास्टिक" ची विक्री करणे तसेच वापर करणे शहरातील दुकानदार, फेरीवाले व नागरिकांनी टाळावे असे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त श्री. दिलीप ढोले यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## खोणी तळोजा महामार्गावर ट्रकची दुचाकीला धडक, अपघातात दुचाकी चालकाचा जागीच मृत्यू

ठाणे : डोंबिवली बदलापूर पाईपलाईन रस्त्यावरून तळोजाला जाणाऱ्या खोणी तळोजा महामार्गावर एका ट्रकनं दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकी चालकाचा जागीच मृत्यू झाला. ट्रक चालकाचं गाडीवरील नियंत्रण सुटल्याने ट्रकने दुचाकीला धडक दिली. रविंद्र ठाकरे असे अपघातात ठार झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. अपघाताची महिती मिळताच उल्हासनगरच्या हिललाईन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत ट्रकच्या क्लिनरला ताब्यात घेतले.

**अपघातानंतर ट्रक चालक फरार**

खोणी तळोजा महामार्गावर आज दुपारच्या सुमारास गुजरात पासिंगचा एक ट्रक चालला होता. ट्रकवरील चालकाचा अचानक गाडीवरील ताबा सुटला आणि ट्रक अनियंत्रित झाला. यामुळे पुढे चाललेल्या दुचाकीला ट्रकने धडक मारली. या धडकेत दुचाकीवरील चालकाचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर ट्रकचा चालक ट्रक सोडून पळून गेला. मयत दुचाकी चालक रविंद्र ठाकरे हे याच परिसरातील पाली गावात राहणारे असल्याने अपघातानंतर संतप्त जमावाने ट्रकवर दगडफेक करीत




तोडफोड केली. दरम्यान याबाबत पोलिसांना कळविण्यात आले. त्यानुसार उल्हासनगर हिललाईन पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर पोलिसांनी रविंद्र ठाकरे यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालयात पाठवला. अपघातानंतर ट्रकचा चालक फरार झाल्याने पोलिसांनी ट्रकच्या क्लिनरला ताब्यात घेतले असून त्याची पुढील चौकशी पोलीस करीत आहेत.

**भोकरचे दोन तरुण बीडमध्ये ठार, एक गंभीर**

दरम्यान बीड जिल्ह्यातील तेलगांवजवळही आज सकाळी अपघाताची घटना घडली आहे. भरधाव कार झाडावर आदळून झालेल्या अपघातात नांदेडच्या दोन युवकांचा मृत्यू झालाय, तर एक जण गंभीर जखमी आहे. हे तिघेही नांदेड जिल्ह्यातील भोकर शहरातील शहीद प्रफुल गोवंदे नगर इथले रहिवासी आहेत. भोकरहून बीड मार्गे हे तरुण शिर्डी इथे साई दर्शनासाठी जात होते. या दरम्यान त्यांची भरधाव कार झाडाला धडकल्याने हा अपघात झालाय. दरम्यान, या दुर्घटनेनंतर भोकर शहरात हळहळ व्यक्त करण्यात येतेय.

## वृद्ध महिलेची धारदार शस्त्राने वार करुन हत्या, कारण अस्पष्ट, घटनेमुळे डोंबिवलीत खळबळ



डोंबिवली : घरात एकटीच असलेल्या एका 58 वर्षीय वृद्ध महिलेची धारदार शस्त्राने गळा कापून हत्या केल्याची धक्कादायक घटना डोंबिवलीत घडली आहे. या हत्येमुळे डोंबिवलीत एकच खळबळ माजली आहे. मात्र ही हत्या कुणी केली ? हत्येचे कारण काय ? याबाबत अद्याप कोणतीही माहिती मिळाली नाही. विजया बाविस्कर असे हत्या करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. या घटनेची तात्काळ टिळकनगर पोलीस ठाण्यात माहिती देण्यात आली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेत पुढील तपास सुरु केला आहे. सकाळी कामवाली बाई आल्यानंतर हत्येची घटना उघडकीस मिळालेल्या माहितीनुसार डोंबिवली पूर्व भागातील टिळकचौक परिसरात आनंद शिला ही इमारत आहे. या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर विजया बाविस्कर या 58 वर्षीय महिला भाड्याने राहत होत्या. टिळक चौक परिसरातच विजया यांच्या घराचे पुनर्विकासाचे काम सुरु असल्याने त्या या इमारतीत भाड्याने राहत होत्या. विजया यांना तीन बहिणी असून त्या आपल्या कुटुंबासोबत वेगळ्या राहतात. विजया त्यांच्या घरी एकट्याच रहायच्या. सोमवारी सकाळी विजया यांच्या घरी घरकाम करणारी महिला काम करण्यासाठी आली तेव्हा घराला बाहेरुन कडी होती. महिलेने कडी खोलून घरात प्रवेश केला असता तिला विजया या रक्ताच्या थारोळ्यात मृतावस्थेत आढळल्या. विजया यांच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार करुन त्यांची हत्या करण्यात आली होती.

## पोलिसांची मदत हवीय? डायल करा 112 अन पुढच्या 7 मिनिटात पोलिसांची मदत मिळवा

पुणे – सर्वसामान्य नागरिकांच्या मदतीसाठी पुणे पोलीस कायमच धावून येतात. अडचणीच्या काळात नागरिकांना अधिक वेगवान मदत मिळावी यासाठी पुणे पोलिसांनी मदतीसाठीचा डायल 112 योजना सुरु केली आहे. पोलिसांनी प्रायोगिक तत्वावर 8 सप्टेंबर 2021 ला अय योजनेला सुरुवात केली. या योजनेच्या माध्यमातून अडचणीच्या काळात 112 नंबर डायल केल्यानंतर संबंधित व्यक्तीला 7 मिनिटामध्ये पोलिसानांची मदत मिळत आहे .



अशी घेतली जाते दखल

राज्यातील नागरिकांना एकाचवेळी सर्व प्रकारची मदत मिळावी. या उद्देशाने 112 या डायल ही योजना सुरु करण्यात आली. यामध्ये तक्रारदार व्यक्तीचा सर्व तक्रारी कॉल प्रथम नवी मुंबईतील केंद्राला जातो. तेथे तक्रारीसंदर्भात संपूर्ण माहिती घेऊन तो कॉल संबंधित जिल्ह्याला पाठविला जातो. तक्रार पाहून त्यावेळी तेथून जवळ असलेल्या पोलीस मार्शलला त्याची माहिती पाठविली जाते. मार्शल कॉल्सची पूर्तता करुन त्याची माहिती दिली जाते. ही सर्व प्रक्रिया ऑनलाईन पारपडते.

लोकेशन कळण्यास अडचण

यापूर्वी पोलिसांना एखाद्या तक्रारदाराने 100 नंबर वर कॉल केला असता तक्रारदार यांचे लोकेशन कळत नसत. परंतु आता डायल 112 प्रणालीवर कॉल केला असता तक्रारदार याचे लोकेशन समजते. त्यामुळे तक्रारदार यांना तत्काळ मदत मिळत आहे.

**दररोज 300 कॉल्स**

पुणे पोलीस आयुक्तालयात सर्व तांत्रिक सुविधांसह सुसज्ज असे डायल 112 चे नियंत्रण कक्ष उभारलेले आहे. डायल 112 प्रणालीस जनतेकडून उत्तम प्रतिसाद मिळत असून दररोज जवळपास 300 कॉल्सची वेळेत पूर्तता करण्यात येत आहे. डायल 112 ' प्रणाली व्यवस्थितपणे कार्यरत ठेवण्याकरीता 51 चारचाकी व 107 दुचाकीवर असे एकूण 157 वाहनांवर डायल 112चे डिव्हाईस बसविण्यात आले आहेत.

# खारेगाव रेल्वे उड्डाणपुलाला धर्मवीर आनंद दिघे यांचे नाव






ठाणे, दि. १५ (जिमाका) :- खारेगाव येथील रेल्वे उड्डाणपूल हा सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांमधून झाला असून ठाण्यावर अपार प्रेम असलेले दिवंगत जिल्हाप्रमुख धर्मवीर आनंद दिघे यांचे नाव या उड्डाणपुलाला देण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे नगरविकास मंत्री आणि ठाणे जिल्हा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी येथे केली. या उड्डाणपुलाच्या उभारणीत वेळोवेळी सगळ्यांनी पाठपुरावा केल्यामुळे हा उड्डाणपूल उभा राहू शकला आहे. त्यामुळे कोणी श्रेयवादात पडू नये, अशी स्पष्टोक्तीही त्यांनी केली.

खारेगाव येथील रेल्वे उड्डाणपुलाचा लोकार्पण सोहळा आज पार पडला त्यावेळी बोलताना त्यांनी ही बाब स्पष्ट केली. या पुलाच्या उभारणीत बराच कालावधी गेला असला तरीही त्यामुळे आता रेल्वे फाटक ओलांडताना होणारे अपघात टळणार असल्याचे समाधान वाटत असल्याचे श्री. शिंदे यांनी सांगितले. भाषणाच्या सुरुवातीला त्यांनी या फाटकाच्या ठिकाणी रेल्वे अपघातात आजवर मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहिली.

मध्य रेल्वे आणि ठाणे महानगरपालिका यांनी एकत्रितपणे तयार केलेल्या या रेल्वे उड्डाणपुलासाठी ३८ कोटी रुपये खर्च करण्यात आला. रेल्वे रुळांवरील पुलाच्या भागाचे काम मध्य रेल्वेने, दोन्ही बाजूकडील पोहोच रस्ता आणि पादचारी पुलाचे काम ठाणे महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच, महापालिकेने पोहोच रस्त्यासाठी आवश्यक असलेल्या मफतलाल

**↗ नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा**

**↗ नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले उड्डाणपुलाचे लोकार्पण**

कंपनीच्या जमिनीच्या अधिग्रहणासाठी ४१ कोटी रुपयेही अदा केले.

२००० साली या पुलाची मागणी सर्वप्रथम करण्यात आली होती. तेव्हापासून असंख्य अडथळ्यांची शर्यत पार पाडत, सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे हा उड्डाणपूल झाला, असे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सांगितले. पुलाला मंजुरी २००८ मध्ये मिळाली होती, पण कामाला गती खऱ्या अर्थाने २०१४ नंतर आली, असेही ते म्हणाले. आधी खारेगावचं मैदान वाचवण्यासाठी आरेखन बदलण्यात आले. तर नंतर ४१ कोटी रुपये मफतलाल कंपनीला देऊन त्यानंतर या पुलाच्या पोहोच रस्त्यांचे काम पूर्ण केले गेले.

या काळात अनेकांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्यानेच आज या पुलाचे काम पूर्ण झाले असून हे श्रेय एकट्याचे नसून सगळ्यांचे आहे, असेही ते म्हणाले.

कळवा-मुंब्रा येथील विकासकामांना पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी कायमच झुकतं माप दिलं असून त्यांनी कधीही त्यात दुजाभाव केलेला नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. या पुलाच्या कामाचे श्रेय घेण्याचा प्रश्नच नसून त्यामुळे लोकांचे प्राण वाचत आहेत हे जास्त समाधानकारक असल्याचे ते म्हणाले.

एकनाथ शिंदे आणि आपल्यात फार आधीपासूनच मैत्रीचा अदृश्य धागा असून तो आपण कायम जपला आहे. निधी मंजुरीसाठी कधीही एकनाथ शिंदे यांच्याकडे जावं लागलं नाही. सत्ताधारी कसा असावा, याचं ते उत्तम उदाहरण आहेत, अशा शब्दात डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी एकनाथ शिंदे यांचे आभार मानले.

आज पार पडलेल्या या सोहळ्याला ठाण्याचे महापौर नरेश म्हस्के, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विपीन शर्मा, उपमहापौर पल्लवी कदम, सभागृह नेते अशोक वैती, स्थायी समिती सभापती संजय भोईर, विरोधी पक्षनेते आश्रफ शानू पठाण यांच्यासह स्थानिक नगरसेवक उपस्थित होते.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898